MHKO100015332023

**नियमीत दिवाणी दावा क्र. २७८/२०२३**

शांताबाई पाटील उर्फ मेटवार.
//वि//
बापू पाटील वगैरे.

**निशाणी क्र. १७ वर आदेश**

प्रस्तुत अर्जाद्वारे वादी यांनी प्रतिवादी क्र.९ विरुध्द दावा "एकतर्फा" आदेश करणेबाबत आदेश व्हावा याबाबत विनंती केलेली आहे. प्रतिवादींतर्फे प्रस्तुत अर्जाचे मागील पानावर म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शणास येत आहे की, प्रतिवादी क्र.९ यास समन्स बजावणीसाठी बेलिफ गेले असता त्याच्या वतीने त्याची आई प्रतिवादी क्र.८ आणि त्याचे भावाने त्याच्यावतीने समन्स स्विकारल्याचा अहवाल निशाणी क्र.६ येथे दिनांक ०४/०१/२०२४ रोजी दाखल केलेला आहे. या आधारावर वादीतर्फे वकीलांनी प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.९ यास या दाव्याकामी समन्सची बजावणी झालेली आहे म्हणुन त्याचेविरुध्द एकतर्फा आदेश पारीत करण्याची विनंती केली. परंतु, सर्व प्रतिवादींतर्फे वकीलांनी प्रस्तुत अर्जास विरोध केला आणि कथन केलेले आहे की, प्रतिवादी क्र.९ हा मतिमंद असुन वादी यांनी त्याच्याविरुध्द प्रस्तुत दाव्यात कारवाई दिवाणी प्रक्रिया संहिताच्या आदेश ३२, नियम १५ अन्वये करणे आवश्यक आहे कारण प्रतिवादी क्र.९ चे देखील प्रस्तुत दाव्यातील मिळकतीमध्ये कायदेशिर हक्क आणि अधिकार गुंतलेले आहेत. करीता, वादीने कायद्यात दिलेल्या वरील तरतुदीनुसार प्रतिवादी क्र.९ च्या बाबतीत दखल घेणे आवश्यक आहे. सबब, प्रस्तुत दाव्यात निशाणी क्र.६ वरील बेलिफ अहवाल जरी प्रतिवादी क्र.९ यास दाव्याच्या समन्सची बजावणी असे दाखवित आहे तरी त्याला कायदेशिरपणे समन्सची बजावणी झालेली नाही असे समजण्यात यावे. प्रतिवादीतर्फे वकीलांनी प्रतिवादी क्र.९ हा मतिमंद असलेबाबतचा पुरावा म्हणुन सी.पी.आर. हॉस्पीटल, कोल्हापूर यांनी दिलेला दाखला निशाणी क्र.२१ सोबत दाखल केलेला आहे.

०३. निशाणी क्र.२१ सोबत दाखल सि.पी.आर.हॉस्पीटल, कोल्हापूर यांनी

दिलेल्या दाखल्यावरुन प्रथमदर्शनी दिसुन येत आहे की, प्रतिवादी क्र.९ हा मतिमंद आहे. सबब, दिवाणी प्रक्रिया संहिताच्या आदेश ३२, नियम १५ नुसार अशाप्रकारच्या पक्षकारांसाठी कायद्यामध्ये विशेष तरतुदी दिलेल्या आहेत. त्यानुसार, वादीने प्रस्तुत दाव्यात दुरुस्ती करणे संयुक्तीक आहे. त्याशिवाय, प्रतिवादी क्र.९ च्या विरुध्द कोणताही आदेश निशाणी क्र.६ कडे दाखल बेलिफ अहवालाच्या आधारावर देणे न्यायोचित होणार नाही. करीता, प्रस्तुतचा अर्ज वरील कारणामुळे फेटाळून वादी याने प्रतिवादी क्र.९ च्या बाबतीत कायद्यात दिलेल्या तरतुदीनुसार योग्य ती दुरुस्ती करुन पुर्तता करावी.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

Digitally signed by SACHIN DURGASHANKAR MEHTA
Date: 2025.07.18 17:42:01 +0530

**( एस. डी. मेहता )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः १८/०७/२०२५.

:: **CERTIFICATE** ::

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. D. Mehta,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 18/07/2025 |
| Order signed by P.O. on | 18/07/2025 |
| Order uploaded on | 18/07/2025 |